दैनिक महा मेट्रो

www.mahametronews.in

वर्ष ४ थे : अंक : १७ पुणे, शनिवार, ६ सप्टेंबर २०२५ | पाने : ४ किंमत : ३.००

RNI NO.MAHMAR2022/87390

VOL NO.04. ISSUE : 17 Pune, Saturday, 6 September 2025 | Pages : 4 PRICE : 3.00


# पुणे आयुक्तालयात गणेशोत्सवात मोठा बंदोबस्त



* पुणे शहरात ९३ अतिसंवेदनशील मंडळे, १०२ संवेदनशील मंडळे व ८० गर्दिचे चौक/ ठिकाणे आहेत.
* पुणे शहरात एकुण ३,९५९ गणपती मंडळे आहेत.
* श्री गणेशोत्सव २०२५ च्या अनुषंगाने परिमंडळीय पोलीस उप आयुक्त, पुणे शहर यांना गर्दिचे ठिकाणी सर्वेलन्ससाठी मोबाईल सर्वेलन्स व्हेईकल्स पुरविण्यात आल्या आहेत.
* महाराष्ट्र शासन पर्यावरण विभाग, ध्वनीप्रदूषण नियम २००० च्या अनुषंगाने अंमलबजावणीबबतचा जिल्हाधिकारी तथा जल्हादंडाधिकारी पुणे यांचे कार्यालय यांच्याकडून ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक १२.०० वा. पर्यंत परवानगी देण्यात आली आहे. तसेच सुट दिलेल्या दिवसांखेरीज इतर दिवशी ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक मनाई आदेश दिले आहेत.
* पुणे शहरातील गणेशोत्सवानिमित्त सार्वजनिक शांतता अबाधित ठेवण्याच्या दृष्टीने कायदा व सुव्यवस्था चा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणुन दि. २७/०८/२०२५ रोजी व ०६/०९/२०२५ रोजी पर्यंत संपुर्ण पुणे जिल्ह्याकरीता सर्व प्रकारच्या मद्यविक्री बंद ठेवण्याकरीता आदेशित करण्यात आले आहे.
* फरासखाना पोलीस स्टेशन हद्दित २० ठिकाणी वॉच टॉवर उभारून त्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त लावण्यात आला आहे.
* परिमंडळीय स्तरावर पेट्रोलिंग, विभागिय स्तरावर पेट्रोलिंग, पोलीस स्टेशन स्तरावर पेट्रोलिंग, चौकी स्तरावर पेट्रोलिंग करण्यात येणार आहे.
* मेट्रो रेल्वेचे स्वारगेटपर्यंत विस्तारीकरण झाले असून, त्यात कसबा पेठ, मंडई या पुण्याचे मध्यवर्ती भागातील स्टेशनांमध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे गणेशोत्सवादरम्यान सदर मेट्रो स्टेशनवर मोठया प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता गृहीत धरून, संबंधित पोलीस उप आयुक्त व पो नि यांना बंदोबस्त पुरविणे करीता आदेशित करण्यात आले आहे.
* गणेश विसर्जन मिरवणुक मार्गावर ठिकठिकाणी पोलीस मदत केंद्र उभारण्यात आले आहे. त्याठिकाणी ०१ अधिकारी, ०१ महिला अंमलदार व स्वयंसेवक यांची नेमणुक करण्यात आली आहे.

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहरात शुक्रवारी व शनिवारी गणेशोत्सवाची सांगता भव्य मिरवणुकीने होणार आहे. अत्यंत मनोभावे साज-या होणा-या या लोकोत्सवाची सांगता देखील त्याच दिमाखात व भव्य स्वरुपात होत असते. भव्य स्वरुपातील मिरवणुकांमुळे पुणे शहराला यात्रेचे स्वरुप येते. सदर विसर्जन मिरवणुका पाहण्यासाठी पुणे शहरातील स्थानिक लोकांसोबतच इतर जिल्हयातील, राज्यातील प्रेक्षक, पत्रकार, विविध संघटनेचे स्वयंसेवक मोठया प्रमाणात गर्दी करीत असतात. यावर्षी या कालावधीत मानाचे व महत्वाचे गणपती सोबतच एकूण ३९५९ गणेश मंडळांचे गणपतीचे विसर्जन होणार आहे. मुख्य मिरवणुकीचा मार्ग शहरातील विविध भागातुन सुरु होऊन खंडूजीबाबा चौक, नटेश्वर घाट याठिकाणी येऊन संपत असतो. तसेच शहरातील इतरही काही भागात स्वतंत्र विसर्जन मिरवणुकीचे मार्ग आहेत. विसर्जनासाठी पुणे शहरात १५० पेक्षा जास्त घाटांची व्यवस्था करण्यात आलेली आहे. पुणे शहर पोलीस आयुक्तालयात गणेश विसर्जनासाठी पुढीलप्रमाणे मनुष्यबळ लावण्यातआलेले आहे.

गणेश विसर्जनासाठी पुणे पोलीस आयुक्तालयांतर्गत पोलीस आयुक्त, पुणे शहर, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर, अपर पोलीस आयुक्त, प्रशासन, पुणे शहर, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, पुणे शहर, अपर पोलीस आयुक्त, पुर्व व पश्चिम प्रादेशिक विभाग, पुणे शहर तसेच १२ पोलीस उप आयुक्त, ३३ सहाय्यक पोलीस आयुक्त, १४१ पोलीस निरिक्षक, ५५८ सपोनि/पोउनि, ६४४३ अंमलदार, ४६ स्ट्रायकींग, १४ क्युआरटी हिट, ०७ बीडीडीएस पथके, ११०० होमगार्ड व ०१ एसआरपीएफ कंपनी असा मोठ्या प्रमाणात बंदोबस्त लावण्यात आला आहे.

## महत्वाचे...

### महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसुत्र चोरी

**पुणे । प्रतिनिधी**

महात्मा फुले मंडई बाबु गेणू गणपती फिर्यादी ह्या वर नमुद ठिकाणी देवदर्शनास गेले असताना, कोणीतरी अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेऊन फिर्यादी यांचे गळ्यातील ४५,०००/-रु. कि.चे सोन्याचे मंगळसुत्र कशाचेतरी सहाय्याने कट करुन चोरुन नेले.

### मेडिकल मध्ये चोरी

**पुणे । प्रतिनिधी**

शततारका अपार्टमेंट, औंधरोड येथे फिर्यादी यांचे मेडीकल शॉप आहे. शॉपचे शटर कोणीतरी अज्ञात इसमाने उचकटुन अर्धवट शटर उघडुन आत प्रवेश केला . मेडीकलचे कॅश काऊंटर मधील १९,१८०/- रु. रोख व दुसरे साक्षीदार यांचे दुकानातील कॅश काऊंटरमधील ११००/- रोख रक्कम चोरी करुन नेली.

### सोन्याची चैनची चोरी; आरोपी अटक

**पुणे । प्रतिनिधी**

वेल्सस्टँड सोसायटी, खराडी मुंढवा रोड, खराडी, पुणे येथे यातील फिर्यादी यांचे घरी वर नमुद ठिकाणी बाथरुम क्लिनींगचे कामासाठी आलेल्या कामगाराने फिर्यादी यांची ८०,०००/- रु. किं. ची सोन्याची चैन चोरुन नेली. आरोपीत प्रविण दत्ता जाधव ( वय २० वर्षे रा. साडेसतरा नळी, हडपसर याला पोलीसानी अटक केले आहे.

### नऊ लाखांचे मंगळसुत्राची चोरी

**पुणे । प्रतिनिधी**

तुळशिबाग, बुधवार पेठ, पुणे येथे यातील फिर्यादी ह्या जेष्ठ नागरिक महिला आहेत. ह्या वर नमुद ठिकाणी गेले असताना, कोणीतरी अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेऊन फिर्यादी यांचे गळ्यातील नऊ लाख १० हजार -रु.किं. चे सोन्याचे मंगळसुत्र चोरुन नेले.

### एक कोटी १२ लाखाची फसवणूक

**पुणे । प्रतिनिधी**

एकाने इमारत बांधकाम यामध्ये चांगला व्यवसाय असल्याचे सांगून तसेच ते शेअर मार्केट व फॉरेक्स ट्रेडींग मध्ये व्यवसाय करीत असल्याचे सांगितले. त्यांना चांगला परतावा देतो असे आमिष दाखवून फिर्यादी व इतर गुंतवणूक करण्यास भाग पाडून त्यांना कोणताही परतावा न देता त्यांची एक कोटी १२ लाख -रु.ची. आर्थिक फसवणुक केली.

### १२ प्रमुख रस्त्यांवर मोठ्या वाहनांवर बंदी

**पुणे । प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या काळात (शुक्रवारपासून सुरू होणाऱ्या) पिंपरी-चिंचवड आणि पुणे शहरात मोठ्या वाहनांवर बँध आणण्यात आली आहे. शास्त्री रोड, टिळक रोड, कुमठेकर रोड, लक्ष्मी रोड, केळकर रोड, बाजीराव रोड, ऋउ रोड, गच् ठेरव, सिंहगड रोड अशा मुख्य मार्गांवर हे निर्बंध लागू केले जात आहेत. झचझचङ हा सार्वजनिक वाहतूक यंत्रणा या मार्गांवर चालू ठेवल्या जातील, मात्र जड वाहनांना इतर मार्ग वापरण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

# कैद्यांच्या हाताने अनेकजण खुलवतात सौंदर्य !

## कैद्यांच्या मेन्स ‘ पार्लर’ चा निव्वळ नफा दोन लाख ३७ हजार







**पुणे । प्रतिनिधी**

येरवडा मध्यवर्ती कारागृहातील कैदी आता पुरूषांचे सौंदर्य खुलवणत आहेत. राज्यातील पहिल्या मेन्स ‘पार्लर’चे उद्घाटन कारागृह उपमहानिरीक्षक योगेश देसाई यांच्या हस्ते २०१९ मध्ये करण्यात आले होते. पार्लरमध्ये कटिंग, दाढी, फेशियल पासून केसांना डाय लावून कैदी पुरूषांचे व्यक्तीमत्त्व खुलवत आहेत. येथील माफक दर व उत्कृष्ट सेवेमुळे वर्षभरात कैद्यांनी पार्लरच्या माध्यमातुन दोन लाख ३७ हजार रूपये निव्वळ नफा मिळवला आहे .

येरवडा खुल्या कारागृहाच्या माध्यमातुन जेलरोड पोलीस चौकीच्या शेजारी ‘केश कर्तनालय’ सुरू करण्यात आले आहे. या केश कर्तनालयाचे उद्घाटन करण्यात आले आहे. सुरवातीला हे केश कर्तनालय येरवडा मध्यवर्ती करागृहाच्या उद्योग विभागाच्या अंतर्गत होते. गेल्या ऑक्टोंबर पासून येरवडा खुल्या कारागृहाच्या अंतर्गत आले आहे.

या संदर्भात खुल्या कारागृहाचे अधिक्षक अनिल खामकर म्हणाले, ‘‘ कैद्यांची सुधारणा व पुनर्वसन’ हे कारागृहाचे ब्रिद वाक्य आहे. त्यासाठी कैद्यांना विविध उद्योगात गुंतविले जाते. त्यामुळे ते बाहेर पडल्यानंतर उद्योग व्यवसाय करून स्वत:च्या पायावर उभे राहून शकतात. कारागृहातील कैदी शेतीकाम, कारखाना, फर्निचर, कोल्हापूरी चप्पल पासून ते पैठणी साडी बनविण्याच्याचे काम करतात. मात्र ही सर्व कामे नागरिकांच्या दृष्टीक्षेपात येत नाहीत. कारागृहाच्या उद्योग विभागातील उत्पादन लोकांच्या पर्यंत पोचविण्यासाठी लाकडी व लोखंडी फर्निचर, कापड, बेकरी उत्पादनासाठी विक्री केंद्रे आहेत. तर सेवा उद्योगा करीता कारागृहामार्फत इस्त्री, वाशिंग सेंटर सुरू होते. आता मात्र एक पाऊल पुढे टाकण्यासाठी ‘केश कर्तनालय’ सुरू करण्यात आले आहे. ’’ कैद्यांची सुधारणा व पुनर्वसन मुख्यत: खुल्या कारागृहात होते. त्यासाठी खुल्या कारागृहाने जिल्हा नियोजन विकास समितीकडे पाठपुरावा करून तीन गाळे बांधुन घेतले होते. एका खोलीत मेन्स पार्लर, दुस-या खोलीत इस्त्री तर तिस-या खोलीत शेती उत्पादने व इतर सेवा उद्योग सुरू करण्याचा विचार असल्याचे अनिल खामकर यांनी सांगितले.

> **‘‘ येरवडा मध्यवर्ती कारागृहाच्या मागील बाजुस व कारागृह कर्मचारी वसाहतीच्या आवारातच ‘केश कर्तनालय’ कैदी चालवित आहेत. याठिकाणी बाज-रभावापेक्षा कमी किंमत असल्यामुळे नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.वर्षभरात पार्लरच्या माध्यमातुन २ लाख ३७ हजार रूपये निव्वळ नफा मिळवला आहे. तर कैद्यांना ९५ हजार रूपये पगार दिला आहे.**
> **- अनिल खामकर , अधीक्षक, येरवडा खुले कारागृह**

# चाळीतील खोलीचे भाडे ३५ हजार ७२५ रूपये!

## निवृत्त कर्मचाऱ्याला १८ लाख ३९ हजार ४८० रूपये दंड; न्यायालयीन लढाईची वेळ

**पुणे । प्रतिनिधी**

शंभर वर्षांपूर्वीच्या कर्मचारी वसाहतीमधील चाळीतील एका २३१ चौरस फुटाच्या घराचे तब्बल ३५ हजार ७२५ रूपये भाडे राज्य सरकारने लावले आहे. येरवडा प्रादेशिक मनोरूग्णालयातील पुरुष परिचर सेवा निवृत्तीनंतर काही कारणास्तव ४२ महिने चाळीतील घरात राहिले. राज्य सरकारने त्या घराचे तब्बल १८ लाख ३९ हजार ४८० रूपये आकारले आहेत. त्यामुळे आयुष्यभर मनोरूग्णांची सेवा केलेल्या पुरुष परिचाराला आपले पैसे मिळ्वण्यासाटी न्यायालयीन लढाई लढविलगत आहे.

कर्मचारी जर सरकारी निवासस्थानात राहत असेल तर ते सेवानिवृत्त होताच त्यांनी घर सोडणे बंधनकारक असते. त्यांनी घर सोडले नाही तर मोठा दंड वसूल केला जातो. याची प्रचिती नुकतीच येरवडा प्रादेशिक मनोरुग्णायातील पुरुष परिचर रमेश रणपिसे यांना आली आहे. त्यांनी सेवा निवृत्तीनंतर मनोरूग्णालयातील घर न सोडल्यामुळे त्यांना तब्बल १८ लाख ३९ हजार ४८० रूपये दंड आकारण्यात आला आहे. त्यामुळे त्यांच्या सेवानिवृत्त वेतना मधून (पेन्शन) दहा हजार रूपये कपात केली जात आहे. त्यामुळे पूर्ण सेवाकाळात मनोरूग्णांची सेवा केलेल्या रणपिसे यांना तुटपूंजी पेन्शन मिळत आहे. यामध्ये आजारी असलेल्या पत्नीची व परित्यक्ता मुलीचे पालन पोषण कसे करणार असा प्रश्न त्यांना पडला आहे. वसुलीची कपात त्यांच्या सेवानिवृत्ती वेतनातून होत आहे. त्यामुळे ही कपात थांबवावी अशी विनंती रणपिसे यांनी जिल्हा कोषागार कार्यालयातील निवृत्ती वेतन शाखेतील सहाय्यक संचालकांना केली आहे.रमेश रणपिसे मनोरूग्णालयातील शंभर वर्षांपूर्वीच्या निवासस्थान चाळ क्रमांक ६७ मधील खोली क्रमांक २२७ मध्ये राहत होते. ते २८ फेब्रुवारी २०१७ मध्ये सेवानिवृत्त झाले. मात्र, पत्नीच्या आजारपणामुळे त्यांना घर सोडता आले नाही. सरकारी नियमाप्रमाणे त्यांनी तीन महिन्यांच्या आत

**पान ३ वर...**

> **माझे हक्काचे पैसे मिळवण्यासाठी न्यायालयीन लढाई लढावे लागत आहे. हे पैसे मिळण्यासाठी किती वर्ष ला-गणार माहित नाही. माझ्या कुटूंबाला पैसे मिळावे हि विनंती आहे.**
> **-रमेश रणपिसे, पुरुष परिचर येरवडा प्रादेशिक मनोरुग्णायातील**

> **मनोरूग्णालय वसाहतीमधील घरे कर्मचारी सेवानिवृत्तीनंतर देखील सोडत नाहीत. त्यामुळे त्यांना दंड आकारला जातो. मात्र, रमेश रणपिसे यांची परिस्थिती पाहता त्यांच्या सेवानिवृत्ती वेतनातून कपात करू नका, अशी विनंती जिल्हा कोषागार कार्यालयाला करणार आहे.**
> **- अधिक्षक, येरवडा प्रादेशिक मनोरुग्णालय**

# शंभर वर्षांपूर्वीच्या लाकूड, लोखंड आणि घडीव दगडातून लाखो रूपये

## मनोरुग्णालयाच्या जुन्या इमारतीच्या पाडकामाच्या बदल्यात ठेकेदाराला ‘वस्तू विनिमय’ (बार्टर) पद्धतीतून मलई





**पुणे । प्रतिनिधी**

सार्वजनिक बांधकाम विभागाचे (पीडब्ल्यूडी) चे ठेकेदार कसे हुशार असतात याचा प्रत्यय नुकतेच आले. येरवडा प्रादेशिक मनोरुग्णालयाच्या जुन्या इमारतीच्या पाडकामाच्या बदल्यात चक्क शंभर वर्षांपूर्वीच्या सागवान लाकूड, लोखंड आणि घडीव दगड देण्याचा ‘वस्तू विनियमय’ पद्धत (बार्टर सिस्टीम) दिसून आली. त्यामुळे संबंधित ठेकेदार मालामाल झाला.

येरवडा प्रादेशिक मनोरूग्णालयातील जुन्या इमारती पाडून त्या जागी नवीन इमारती बांधल्या जात आहेत. या इमारतीच्या पाडकामाचा ठेका नाशिक येथील एका ठेकेदाराला मिळाले आहे. मात्र, पाडकामाचा ठेका देताना ठेकेदाराला पैसाचा मोबादला न देता त्यांना पाडकामातील जुने सागवान लाकूड, लोखंड, तुळई, घडीव दगड देण्याची वस्तू विनियम पद्धत ( बार्टर सिस्टीम) पीडब्ल्यूडीचे अधिकारी व ठेकेदारांनी अंमलात आणली आहे. त्यामुळे शंभर वर्षांपेक्षा जास्त जुन्या इमारती पाडल्यानंतर त्यातून निघालेला

**पान ३ वर...**

### जुन्या लोखंडी खाटा गेल्या अज्ञात ठिकाणी

**येरवडा मनोरूग्णालयातील भांडार कक्षात अनेक जुने वजनदार लोखंडी खाटा होत्या. यासह ताब्यांची भांडी होत्या. हे खाटा व ताब्याच्या भांडी कधी आणि कोणाला दिले याचा पत्ता नसल्याची चर्चा कर्मचारी वर्गामध्ये आहे. या वस्तूंची नोंद ठेवली असती तर वस्तू वस्तू गेल्या नसत्या अशी भावना कर्मचाऱ्यांची आहे. शंभर वर्षांपूर्वीच्या ब्रिटीशकालीन अनेक मौल्यवान वस्तू गहाळ झाल्याचे समोर आले आहे.**

### सागवान लाकडातून नविन वस्तूंची निर्मिती

**येरवडा मनोरूग्णालयाच्या जुन्या इमारतींमधून मिळालेल्या जुन्या सागवान लाकडातून टेबल खुर्च्या, अनेक शोभेच्या वस्तू बनविता आल्या असत्या. या वस्तूंची विक्री करता आली असती. यातून बरे झालेल्या मनोरूग्णांचे पुनर्वसन प्रकल्पात उपयोग झाला असता, असे काही समाजसेवकांचे मत आहे. त्यामुळे किमान पुढील जुन्या इमारती पाडल्यानंतर त्यातून मिळणारे लाकूड, लोखंड मनोरूग्णालयाच्या ताब्यात ठेवण्याची तयारी मनोरुग्णालय प्रशासन करीत आहे.**

### स्कूटरची धडक बसून ट्रॅफिक कॉन्स्टेबल जखमी

**पुणे । प्रतिनिधी**

कसारवाडी येथील बीआरटीएस मार्गावरील ओव्हरब्रिजवर वाहतूक नियमनाचे काम करत असलेल्या ट्रॅफिक कॉन्स्टेबलला बेदरकार दुचाकी चालकाने जोरदार धडक दिली. या अपघातात कॉन्स्टेबल गंभीर जखमी झाला असून त्याचा डावा हात मोडला आहे. याशिवाय त्याच्याकडे असलेले ई-चलन मशीनही खराब झाले. घटना शनिवारी दुपारी घडली. कसारवाडी परिसरातील बीआरटीएस लेनमध्ये वाहतूक कोंडी टाळण्यासाठी ४२ वर्षीय ट्रॅफिक कॉन्स्टेबल आपले कर्तव्य बजावत होता. त्यावेळी एका स्कूटर चालकाने वाहतूक नियमांचे उल्लंघन करत थांबण्याचा कोणताही प्रयत्न न करता थेट कॉन्स्टेबलला धडक दिली. या अचानक झालेल्या अपघातात कॉन्स्टेबल जमिनीवर कोसळला.

कॉन्स्टेबलला जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. डॉक्टरांनी त्याचा डावा हात मोडल्याचे निदान केले असून पुढील उपचार सुरू आहेत.